महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

-: कार्यालयीन आदेश :-

**विषय :** कनिष्ठ आरेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक आरेखक (वेतनश्रेणी S-१० : २९,२००-९२,३००) (४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर वेतनश्रेणी S-१४ : ३८,६००-१,२२,८००) पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

**प्रस्तावना :**

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक आरेखक (गट-क) (वेतनश्रेणी S-१० : २९,२००-९२,३००) (४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर वेतनश्रेणी S-१४ : ३८,६००-१,२२,८००) संवर्गातील सन २०२४-२५ या निवडसूची वर्षातील (दि.०१.०९.२०२४ ते दि.३१.०८.२०२५) करिता, पदोन्नती कोट्यातील आरक्षित पदांसह खुल्या प्रवर्गाची सर्व रिक्त पदे, कनिष्ठ आरेखक (गट-क) (वेतनश्रेणी S-८ : २५,५००-८१,१००) (५ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर वेतनश्रेणी S-१३ : ३५,४००-१,१२,४००)या निम्न संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीने भरण्याकरिता आवश्यक ती सर्व कार्यवाही पार पाडून, पात्र कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने पदस्थापना करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती. त्यानुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

-: आदेश :-

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ आरेखक (गट-क) (वेतनश्रेणी S-८ : २५,५००-८१,१००) (५ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर वेतनश्रेणीS-१३ : ३५,४००-१,१२,४००) या संवर्गामध्ये कार्यरत असलेल्या खालील नमूद कर्मचाऱ्यांना सहायक आरेखक (गट-क) (वेतनश्रेणी S-१० : २९,२००-९२,३००) (४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर वेतनश्रेणी S-१४ : ३८,६००-१,२२,८००) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव व प्रवर्ग | सध्याच्या पदस्थापनेचे कार्यालय | पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री.सचिन मधुकर मंडले (वि.जा.अ.) | पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे (प्र.नि.) | सहायक संचालक, नगर रचना, परभणी शाखा. (रिक्त पदी) |
| २ | श्रीमती सुचेता शिवाजी घाटगे (अ.जा.) | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सहायक संचालक, नगर रचना, श्रीरामपूर शाखा. (रिक्त पदी) |

०२. सदरहू कर्मचाऱ्यांना, संबंधित कार्यालय प्रमुखांनी सध्याच्या कार्यालयातून दि.२९.०१.२०२५ रोजी (मध्यान्होत्तर) कार्यमुक्त करावे व सदर कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या ठिकाणी दि.३०.०१.२०२५ रोजी (मध्यान्हपूर्व) किंवा लगोलग रुजू व्हावे.

०३. सदर पदोन्नत्या ह्या शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१ मधील शासन आदेशास अनुसरुन, सहायक आरेखक संवर्गातील पदोन्नती कोट्यातील आरक्षित पदांसह खुल्या प्रवर्गाची सर्व रिक्त पदे ज्येष्ठतेने भरण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहेत. त्यानुसार कनिष्ठ आरेखक संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीत नमूद कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येणारे जे मागास वर्गीय कर्मचारी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.२५.०५.२००४ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ मिळून, सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेले आहेत, त्यांचा पदोन्नतीबाबत विचार करण्यात आलेला नाही.

सदरहू कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या ह्या मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ तसेच, संलग्न इतर न्यायालयीन प्रकरणामध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील. परिणामी, पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत शासनाचे अंतिम आदेश निर्गमित झाल्यानंतर, ज्येष्ठता बाधित होणे, ज्येष्ठतेच्या क्रमवारीत बदल होणे किंवा कनिष्ठ कर्मचाऱ्याची पदावनती होणे इत्यादी बाबी उदभवू शकतात, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

०४. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती नाकारायची आहे, त्यांनी ताबडतोब तसे आजच उलट टपाली संचालनालयास अवगत करावे. तसेच, त्यांचा नकार हा तात्पुरत्या स्वरुपातील आहे किंवा कायमस्वरुपी आहे, याबाबत देखील विनंती अर्जामध्ये स्पष्ट नमूद करणे आवश्यक राहील. जे कर्मचारी पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत किंवा पदोन्नती स्वीकारणार नाहीत, त्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती नको आहे, असे समजून त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. पदोन्नतीसनकार दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दि.१२.०९.२०१६ मधील आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

०५. पदोन्नतीस नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांस यापूर्वी, कालबद्ध पदोन्नती / सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला / दुसरा / तिसरा लाभ मंजूर करण्यात आला असल्यास, वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३ डिसेंबर, २०१५ अन्वये या योजनेखाली पहिला, दुसरा अथवा तिसरा लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

**तसेच, रेखाकला संवर्गातील कर्मचाऱ्यांना अकार्यात्मक वरिष्ठ वेतनश्रेणीबाबत, शासनाच्या नगर विकास विभागाकडील पत्र क्र.संकीर्ण-५०२२/१०१२/प्र.क्र.२३४/नवि-२७, दि.३१.०५.२०२३ अन्वये, शासनाच्या वित्त विभागाकडील अनौ/सं.क्र.५३/२३/सेवा-३, दि.१७.०५.२०२३ रोजीच्या प्राप्त अभिप्रायानुसार कळविले आहे की, रेखाकला संवर्गातील अनुरेखक, कनिष्ठ आरेखक व सहायक आरेखक पदांवर मिळणाऱ्या अकार्यात्मक**

वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ, सदर पदांवर कार्यरत संबंधित कर्मचाऱ्याने पदोन्नती नाकारल्याच्या परिणामस्वरुपी काढून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदरचा लाभ काढुन घेण्याबाबतची कार्यवाही संबंधित कार्यालयाचे स्तरावरुन करण्यात यावी. मात्र दिलेल्या लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

०६. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या कर्मचाऱ्यांनी, पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा, असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) (ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील नियम १३ (अ) (१) (२) (ब) (१ व २) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात यावी.

०७. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिनांकास हजर होण्यास कळविण्यात आले आहे व ते नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिनांकास हजर होतील, याबाबत संचालनालयास तातडीने अवगत करण्यात यावे.

०८. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर पदोन्नतीच्या पदावर संबंधित कर्मचाऱ्यांनी तात्काळ रूजू व्हावे, सदरहू आदेशानुसार पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून पदस्थापना बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची संबंधित कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच, राजकीय दबावाची कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ते गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

०९. सदरहू कर्मचारी यांची पदोन्नती ही शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि.२९/०७/२०२४ च्या अधीन राहून करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार, दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये दि.३०.०६.२०१६ पासून दिव्यांग आरक्षण लागू करण्याबाबतच्या निर्णयातील विहित तरतुदीनुसार कार्यवाही करतांना दिव्यांग कर्मचाऱ्यांचा दि.३०.०६.२०१६ पासून पदोन्नतीसाठी दिव्यांग आरक्षण लागू केल्यामुळे, पदोन्नती साखळीतील Inter-se-seniority वर परिणाम होण्याची शक्यता आहे. उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यानुषंगाने ज्येष्ठतेच्या क्रमवारीत बदल होणे इत्यादी बाबी उदभवू शकतात, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. सदर कर्मचाऱ्यांना कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने पदोन्नतीने बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचाऱ्यांस, त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणीकृत देय डाकेने परत करावेत.

११. वरील परिच्छेद १ च्या तक्त्यातील अ.क्र.१ व २ वरील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीने पदस्थापना ह्या प्रशासकीय दृष्टीकोनातून असल्याने त्यांना नियमानुसार अनुज्ञेय असणारा पदग्रहण अवधी त्यांचे अर्जित रजा खाती जमा करण्यात यावा. तसेच त्यांनी अपेक्षिल्यास त्यांना नियमानुसार वेतन अग्रीम / बदली प्रवास भत्ता अग्रीम मंजूर करण्यात यावे.

१२. प्रस्तुत आदेश संचालनालयाच्याwww.dtp.maharashtra.gov.inया संकेतस्थळावरदेखील प्रसिद्ध करण्यात यावेत.

**(मसूदा मा.संचालक, नगर रचना यांनी मंजूर केला असे)**

( र.ना.बालमवार )
प्र.मुख्य प्रशासकीय अधिकारी
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

जा.क्र.आस्था/विपस-२०२४-२५/कआ-सआ/पदो/प्रशा-१/४८९
दि.२९जानेवारी, २०२५.

**प्रत** :- मा.अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२७), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर...

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव** :

१. सहसंचालक, नगर रचना, विभागीय कार्यालय, पुणे / नाशिक/ छत्रपती संभाजीनगर
२. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
३. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा / श्रीरामपूर शाखा / परभणी शाखा.
४. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,----------------------------
५. सर्व संबंधित कर्मचारी (विहित मार्गाने)
६. कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, प्रशा-१अ /प्रशा-१ ब/ लेखा/ अर्थसंकल्प / रेखाकला
७. मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे / मा.उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे यांचे स्वीय सहायक
८. वैयक्तिक धारिका.
९. टिपीव्ही-७

/- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.